# दिनांक 08/03/2025

1 खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 06/03/2025 रोजी 22:15 वा सुमारास मौजे रहाटवडे, खोपोली ता.खालापुर येथे महिला फिर्यादी यांचे शेजारी राहणारा आरोपीत क्र.01 रा.रहाटवडे, खोपोली ता खालापुर यांने काहीएक कारण नसताना दारुच्या नशेत फिर्यादी यांना धकाबुक्की करुन शिवीगाऴी व दमदाटी केली व तेथे पडलेला बांबुने फिर्यादी व त्याची मुले यांना धकाबुक्की करित असताना शेजारी राहणारे साक्षीदार हे सोडविण्यास आले असता त्यांना आरोपीत क्र.01 यांनी बांबुने मारहाण करुन त्याचे उजव्या हाताला दुखापत केली आहे तसेच आरोपीत क्र.02 यांनी फिर्यादी यांची मुलगी हिस शिवीगाऴी केली व आरोपीत क्र.03 यांने तेथेच पडलेला बांबु उचलुन मुलीच्या हिचे पाठीवर अपखुशीने मारुन दुखापत केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.68/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),115(2),352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/ज्योती हंबीर हे करीत आहेत.

2. महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/03/2025 रोजी 00:30 वा च्या सुमारास दुध डेअरीच्या मोकळया जागेत बनविवलेल्या पत्र्याचे शेड एस टी गॅस पंपजवळ महाड ता.महाड येथे फिर्यादी त्याचे दोन भाउ असे घरी झोपलेले असताना दोन आरोपी फिर्यादी यांचे रूममध्यो येवुन फिर्यादी व साक्षीदार यांस चाकुने व हाताबुक्क्यांने मारहाण करून जखमी करून फिर्यादी यांचे पाकीटातील त्यांचा वापरता ओपो कंपनीचा मोबाईल व रोख 1,200/- रूपये जबरदस्तीने काढुन चोरून नेले आहेत. सदर गुन्ह्यातील 02 आरोपी यांना दिनांक 07/03/2025 रोजी 15:26 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.17/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 309(6), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/खाडे हे करीत आहेत.

3. रास्यानी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/03/2025 रोजी 12:00 वा च्या सुमारास मौजे मोहपाडा मच्छीमार्केट समोरील रिक्षा स्टँडच्या ऑफीसच्या बाजूला फिर्यादी यांचे जखमी भावास 03 आरोपीत यांनी कोणत्यातरी अज्ञात कारणावरून लाकडी काठीने मारहाण करून त्याचे डोक्याला दुखापत करून तसेच उजवे हाताचे बोटाचे जवळ व उजव्या मांडीजवळ फॅक्चर केला.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.52/2025, बी.एन.एस कलम 118(2), 115(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/ढोणे हे करीत आहेत.

4. दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 06/03/2025 रोजी 21:30 वा च्या सुमारास मौजे पेण शहराच्या पुढे ईरवाडी गावाच्या जवळ ब्रिज ते पळस्पे फाटा येथे फिर्यादी हे टेम्पो यांने पेण ते तुर्भे येथे प्रवास करित असताना पेण शहराच्या पुढे ईरवाडी गावाच्या ब्रिजजवळ आलेवेळी दोन अज्ञात इसम मोटारसायकल घेवुन फिर्यादी यांना टेम्पो थांबविण्यास सांगितल्याने परंतु फिर्यादी यांनी टेम्पो न थांबविल्याने मोटार सायकल स्वार यांनी शिवीगाळी करत असल्याने फिर्यादी यांनी गाडी न थांबवता भरधाव वेगाने घेवुन ते पळस्पे ब्रिज येथे आलेवेळी मोटार सायकल वरिल इसमांनी त्यांच्या टेम्पोच्या काचेवर दगड फेक केली म्हणुन फिर्यादी हे खाली उतरले असता त्यांच्या दिशेने देखील त्यांनी दगड फेकली असता त्यांना डाव्या हातास, डोळयावर दुखापती झाल्या.

याबाबत दादर सागरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.07/2025,118(1),126(2),352 351(2) 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सानप हे करीत आहेत.

5. म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/03/2025 रोजी 10:00 वा च्या सुमारास मौजे कुडतुडी आदिवासीवाडी ता.म्हसळा येथील महिला फिर्यादी यांचे राहते घरात आरोपीत क्रमांक 1 हे फिर्यादी यांचे पहीले पती आहेत. फिर्यादी या त्यांचे घरात बाथरूम मध्ये कपडे धुवत असताना आरोपीत क्रमांक 1 व 2 यांनी संगणमत करून फिर्यादी यांचे घराचा दरवाजा जोरात उघडुन घरात घुसुन आरोपीत क्रमांक 1 याने फिर्यादीचे डोक्यावर व हातावर लाकडाने फटके मारले व आरोपीत क्रमांक 1 याने आरोपीत क्रमांक 2 यांस फिर्यादी हीस पकडुन ठेवण्यास सांगुन फिर्यादीचे डोक्यात लाकडाची उपट घातली. त्यानंतर आरोपीत क्रमांक 2 याने फिर्यादी हीचे तोंडावर उशी दाबुन ठेवुन आरोपीत क्रमांक 1 बोलला की मला हीचा काटा ब-याच दिवसापासुन काढायचा होता आता चान्स मिळाला आहे हीला जीवंत सोडायची नाही असे बोलून आरोपीत क्रमांक 1 याने त्याच्या हातात असलेल्या स्क्रु ड्रायव्हरने फिर्यादी हीचे गळयावर दोन तीन जागेवर स्क्रु ड्रायव्हर खोपसुन फिर्यादी हीस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.13/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 109,333,3 (5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/एडवळे हे करीत आहेत.

6. मुरुड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/03/2025 रोजी 09:00 वा च्या सुमारास मौजे आरोपीत याचे राहात्या घरी रा,साईमंदिर शेजारी शेगवाडा मुरुड येथे महिला फिर्यादी यांची पिडीत मुलगी ही घरा शेजारी पांढरी फुले अणण्याकारीता घराशेजारी गेली असता आरोपीत याने पिडीत मुलीस कासव दाखविण्याचा बहाणा करुन आरोपीत याने तिचा हात पकडून तिला त्याच्या घरामध्ये घेवून जावून तीला मांडीवर बसवून तीचा फोटो काढला, तीची पप्पी घेतली व

अश्लील कृत्य केले तसेच याबाबत कोणाला सांगु नकोस अशी धमकी आरोपीत याने पिडीत हीस दिली. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 07/03/2025 रोजी 22:51 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत मुरुड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.07/2025, BNS 64,65(2),351(2), बाल लै. अत्या.संरक्षण (POCSO)अधिनियम, 2012 चे कलम 4,6,8,10,12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.विजयकुमार देशमुख हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 07.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 227 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,44,250/-रुपये इतका दंड आकारला आहे.